**नि. क्र. २४ पुढे**

**( फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे साक्ष )**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

**फिर्यादी राहुल विनोद कासार यांचा सरतपास वकील श्री. प्रतिक गोडसे यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

१. आता मला आरोपीने दिलेला दिनांक ०६/०१/२००६ रोजीचा द डॉक्टर पंजाबराव देशमुख अर्बन को - ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड, अमरावती शाखा नांदगाव खांडेश्वर चा धनादेश क्र.१३९५०७, रक्कम रु.३३,९०४/- दाखविला. त्यावर दत्तात्रय ऊस तोडणी व वाहतुक सहकारी संस्था मर्यादित यांचे नाव आहे. त्यावर आरोपीची सही आहे. सदर सही मी ओळखतो. सदर धनादेशामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.३६** देण्यात येते.

२. आता मला दि.१४/०३/२००६ रोजीचा डॉक्टर पंजाबराव देशमुख अर्बन को - ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड, अमरावती शाखा नांदगाव खांडेश्वर चा धनादेश अनादरीत झाल्याने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्यादित, शाखा मंचर यांना आलेला रिटर्न मेमो दाखविण्यात आला. त्यावर बँकेचा सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र.३७** देण्यात येते. आता मला दि.२४/०३/२००६ रोजीचा पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्यादित, शाखा मंचर चा धनादेश अनादरीत झाल्याने फिर्यादी संस्थेला दिलेला रिटर्न मेमो दाखविण्यात आला. त्यावर बँकेचा सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र.३८** देण्यात येते.

३. धनादेशाच्या रकमेची मागणी करण्याकरिता वकीलांमार्फत आरोपीस पाठविलेल्या दि.१७/०४/२००६ रोजीच्या नोटीसीची ऑफीस कॉपी दाखल केलेली

असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर वकीलांची सही आहे. सदर नोटीसला **निशाणी क्र.३९** देण्यात येते. सदर नोटीस आरोपीला रजिष्टर पोष्टाने पाठविल्याची पोष्टाची दि.१७/०४/२००६ रोजीची आर.पी.ए.डी. रिसिट दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र.४०** देण्यात येते. सदर नोटीस आरोपीला रजिष्टर पोष्टाने पाठविल्याची पोष्टाची दि.१७/०४/२००६ रोजीची यु.पी.सी. पावती दाखल केली आहे. त्यावर पोष्टाचा शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र.४१** देण्यात येते. सदर नोटीस आरोपीने न स्विकारल्याने नोटीसीचा लखोटा दि.२६/०४/२००६ रोजी परत आला. त्यास **निशाणी क्र.४२** देण्यात येते.

४. आता मला दि.२७/१०/२०१३ रोजीचे फिर्यादी संस्थेने सदर खटला चालविण्यासाठी दिलेले अधिकार पत्र दाखविण्यात आले. त्यावर व्यवस्थापकांची सही आहे व संस्थेचा शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.४३** देण्यात येते. आरोपीचा फिर्यादी संस्थेकडील दि.२३/१२/२००४ ते ३१/०३/२००५ पर्यंतच्या खाते उता-याची मुळप्रत दाखल केली आहे. त्यावर मुख्य लेखापाल व लेखापाल यांची सही आहे व संस्थेचा शिक्का आहे. सदर सही मी ओळखतो. त्यास **निशाणी क्र.४४** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी ब-याच वर्षापासुन मिळुन येत नसल्याने त्याच्याविरुध्द प्रोक्लमेशनचा आदेश झाला आहे व साक्षीदारांची साक्ष फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे नोंदविण्यात आली.**

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**घोडेगाव, जि. पुणे.**

**दिनांकः ०१/०८/२०२६.**
**घोडेगाव**